# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड   जा.क्र. 272/2023   दिनांक : 14.07.2023**

**कोंबींग ऑपरेशन राबवुन अग्निशस्त्र वापरून गुन्हे करणाऱ्या आरोपीतांना चेक करून कायदेशिर कार्यवाही करण्यात आली.**

नांदेड शहरातील अग्नीशस्त्र वापरून गुन्हे करणाऱ्या आरोपीतांना कोंबीग ऑपरेश राबवुन त्यांना चेक करून त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने दिनांक 14.07.2023 रोजी 23.00 ते दिनांक 15.07.2023 चे 04.00 वा. चे दरम्यान स्थागुशाचे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच शहरातील पोलीस स्टेशन भाग्यनगर, विमानतळ, शिवाजीनगर, वजिराबाद, इतवारा आणि नांदेड ग्रामीण चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कोंबीग ऑपरेशन राबवुन अग्निशस्त्राचा वापर करून गुन्हे करणारे आरोपीतांना चेक करून त्यांचेवर कार्यवाही करण्यात आली आहे.

सदर कार्यावाही मध्ये **स्थागुशाचे** दोन पोलीस अधिकारी आणि सहा पोलीस अंमलदार यांनी भाग घेवुन अकरा अग्निशस्त्र वापरणारे आरोपी चेक करून एक आर्मस ॲक्टची कार्यवाही करून खंजर जप्त करण्यात आला आहे. आणि **पोस्टे मुदखेड गुरन 21/2023 कलम 395 भदवि व सह कलम 3/25 भाहका 3(1) 3(2) 3(4) मोक्का मधील फरार आरोपी नामे अजय शामराव राठोड, वय 27 वर्षे, रा. वरदडा तांडा ता. मुदखेड जि. नांदेड** यास अटक केली आहे.

**पोस्टे भाग्यनगरचे** चार पोलीस अधिकारी व बारा अंमलदार यांनी भाग घेवुन अठरा अग्निशस्त्राचा वापरणारे आरोपी चेक केले.

**पोस्टे विमानतळचे** चार पोलीस अधिकारी व वीस पोलीस अंमलदार यांनी भाग घेवुन एकोणवीस अग्निशस्त्र वापरणारे आरोपी चेक करून दोन वॉरंट तामील केले.

**पोस्टे वजिराबाद** हध्दीत एक अर्मस ॲक्टची कार्यवाही करून खंजर जप्त करण्यात आला. एक पाहिजे आरोपी अटक केला. जबरी चोरीतील दोन आरोपी अटक केले. पोस्टे इतवाराचे पाच पोलीस अधिकारी आणि तीस पोलीस अंमलदार यांनी भाग घेऊन तेवीस अग्निशस्त्र वापरणारे आरोपी चेक केले. एक पाहिजे असलेला आरोपी अटक केला आहे.

**पोस्टे शिवाजीनगरचे** तीन पोलीस अधिकारी आणि अठरा पोलीस अंमलदार यांनी भाग घेवुन तेरा अग्निशस्त्र वापरणारे आरोपी चेक केले. 110/117 महराष्ट्र पोलीस कायद्याच्या चार कार्यावाहया केल्या. पोस्टे नांदेड ग्रामीणचे चार पोलीस अधिकारी आणि चोवीस पोलीस अंमलदार यांनी भाग घेवुन एकतीस अग्निशस्त्र वापरणारे आरोपी चेक केले आणि एक आर्मस ॲक्टची कार्यवाही करून एक खंजर जप्त केला आहे.

सदरची कार्यवाही **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली **मा. श्री आबिनेश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड **मा. श्री खंडेराय धरणे**, अपर पोलीस अधिक्षक भोकर, **मा. श्रीमती शाफकत आमना**, उपविभागीय पोलीस अधिकारी भोकर, **मा. श्री. गौहर हसन**, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड ग्रामीण, **मा. श्री सुरज गुरव**, उपविभागीय पोलीस अधिकारी उप विभाग नांदेड शहर **मा. श्री. चंद्रशेन देशमुख**, उपविभागीय पोलीस अधिकारी देगलुर, **मा. श्री. प्रशांत संपते**, उपविभागीय पोलीस अधिकारी धर्माबाद, **मा. श्री. मारोती थोरात**, उपविभागीय पोलीस अधिकारी कंधार, यांनी व वरील प्रमाणे पोलीस स्टेशन येथील मनुष्यबळासह त्यांच्याच हध्दीमध्ये कोंबीग ऑपरेशन राबवुन कार्यवाही करण्यात आली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड

